

# 1150

**1150**
HUDDĀR (N.), *ed.*
Abhinava gītāñjalī (prabhāta-pherīsāṭhīṃ).
Nāgapura: N. Huddāra, [1930].
10 p. 18 cm.
Nationalistic songs.
PP Mar B 2

NATIONAL ARCHIVES OF I

129
80 PP Mar. B2
CP A/36/3

॥ वंदे मातरम् ॥

# अभिनव गीतांजली

[ प्रभात–फेरीसाठीं ]

INDIA OFFICE
17 JUL 1931
LIBRARY

DATE 6/8/1930

संपादक, मुद्रक व प्रकाशक:

**श्री. ना. [illegible], बी. ए. [ टिळक ]**

अभिनव मुद्रणालय, नागपुर शहर.

किंमत ८/ ]

[ प्रथमावृत्ति

NATIONAL ARCHIVES OF INDIA

# निवेदन !

सविनय कायदेभंगाची राष्ट्रीय चळवळ आज देशांत वणव्यासारखी पेट घेत आहे. अशावेळीं लोकांच्या मनांतील सुप्त भावना जागृत करून व त्यांचीं अंतःकरणें देशप्रेमानें हालवून त्यांस कार्यप्रवृत्त करण्याचे हेतुनें अलीकडे शहरोशहरीं प्रभातफेऱ्याहि नियमानें व शिस्तीनें निघत आहेत. प्रस्तुतचा प्रयत्न, प्रभातफेऱ्यांतून भाग घेणाऱ्या मुलांमुलींना म्हणतां येतील अशी कांहीं तेजस्वी, राष्ट्राभिमानयुक्त व जनतेंत चैतन्य निर्माण करणारी पदें पुरवावी हा आहे.

प्रस्तुत ‘ अंजली ’ त ज्या ज्ञात–अज्ञात कवींचीं कवनें संग्रहित केलीं आहेत, त्यांचा मी फार ऋणी आहे. प्रस्तुत अंजलींतील पदांमुळें व्हाइसरायांचा मुद्रणालयांसंबंधीचा वटहुकूम धाब्यावर बसविला गेला असा नोकरशाहीकडून आरोप केला जाण्याचा संभव आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. पण मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य व कर्मस्वातंत्र्य हे प्रत्येक देशांतील जनतेचे मूलभूत व स्वयंसिद्ध असे हक्क आहेत. हे हक्क हिरावून घेण्याचा अधिकार आधुनिक युगांत कोणालाही नाहीं. तथापि [illegible] प्रागतिक व स्वतःस सुधारणाप्रिय समजणाऱ्या हिंदुस्थानांतील आंग्ल नोकरशाहीनें मुद्रणालयांसंबंधींचा वटहुकूम काढून हिंदी जनतेच्या मुद्रणस्वातंत्र्याच्या हक्कावर घाला घातला आहे. हिंदी जनतेच्या राष्ट्रीय आकांक्षा दडपून टाकून स्वातंत्र्य संपादनाच्या प्रस्तुतच्या तेजस्वी चळवळीला जोर येऊं नये हा उघड उघड यांत हेतु असल्यामुळें प्रस्तुत वटहुकूम अर्थातच अत्यंत अन्याय्य व जुलमी आहे. या वटहुकुमापुढें निमुटपणें मान वांकविणें किंवा त्याचा निषेधपूर्वक धिःकार करून धैर्यानें तो मोडण्यास सिद्ध होणें हे दोनच मार्ग मुद्रणालयांच्या चालकांसमोर आहेत. स्वाभिमानाच्या दृष्टीनें स्वतःचे हक्क प्रस्थापित करण्यासाठीं दुसऱ्या तेजस्वी मार्गाचें अनुसरण करून —

**कायदेभंग करणें**

हेंच प्रस्तुत काळांतलें विहित व इष्ट कर्तव्य होय असें मी समजतो व याच हेतुनें प्रस्तुत ‘ गीतांजलि ’ संग्रहित करून प्रकाशित करीत आहे.

ही अल्प सेवा मातृभूमीच्या चरणकमलीं रुजू व्हावी अशी जनताजनार्दनरूपी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

टिळक पुण्यतिथि, ता. १ आगस्ट १९३०. प्रकाशक.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

॥ वंदेमातरम् ॥

# अभिनव गीतांजलि

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।

खरा धर्म देशार्थ हा जीव द्यावा ।
खरा धर्म विश्वार्थ हा जीव द्यावा ॥
खरा धर्म दुष्टांसि दुर्दंड द्यावा ।
खरा धर्म नेई जनां मोक्षगांवा ॥

---

असे सत्य सामर्थ्य सामर्थ्य जैसें ।
नसे अन्य सामर्थ्य सामर्थ्य तैसें ॥
धराया तुम्हीं कास सत्याग्रहाची ।
पहाना तुम्हीं कां परीक्षाच याची ॥

---

हें आंग्ल राज्य बुडवा । मुळि नुरवा ।
स्वातंत्र्य अर्पुनी मातृभूमि निज सौभाग्यें नटवा ॥धृ०॥
व्यापारमिषें येवोनी । येथील देश व्यापोनी
हा वाणी बनला धनी । भारतीं पेटवी दारिद्र्याचा जिथें तिथें वणवा ॥१॥
देशार्थ जनन जाणोनी । हिंदुस बंधु मानोनी
हें राष्ट्र संघ स्थापोनी । चैतन्य तयानें हिंदू हिंदूच्या हृदीं हृदीं भरवा ॥२॥
पूर्वजीं शौर्य गाजविलें । देशार्थ झटोनी मेले
या परि पाहिजे केले । हिंदुत्व रक्षणा आर्यभूमिची तसूतसू लढवा ॥३॥
हिंदु ते सर्व जमवोनी । अहिंसालें सख्य करोनी ।
युद्धास सिद्ध राहोनी । रणरंगी रंगुनी अपुला झेंडा घरोघरीं झुलवा ॥४॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

# निशाण

* * *

हें निशाण स्वातंत्र्याचें,
हें निशाण रणमर्दांचें,
हें निशाण क्षात्र तेजाचें;
ठाकिलें जिथें एकदां । जरि विपदा । तेथली होई,
मग कुणी कुणाचा नाहीं.
तो ध्वज चि माऊली, तात,
तो ध्वज चि सुहृद संतत
तो ध्वज चि [illegible] जीवित
तत्पदीं जो नत जाहला । तोचि आपुला । सखा जीवाचा
तदितरि भाव शत्रूचा.
तें विभव देशि निज विलसे
जी कीर्ति रिपुमुखीं वसे
जे तेज कणकणीं दिसे
तें जगा कथाया सकल । निशिदिनीं अचल । डुले डौलानें
नभि अफाट ध्वजरूपानें.
ध्वज परमेश्वर देशाचा,
ध्वज परमात्मा देशाचा,
ध्वज सौख्यकंद देशाचा,
सर्वस्व जया बोलती, तेंच निश्चितीं । ध्वजाचें ठायीं
प्रिय दुजें न त्याविण कांहीं.
जरि देव, धर्म भिन्नता,
नच विचारीं वा एकता,
वर्तनीं तशी वक्रता,
परि सूर्य जसा सकळिकां । गमे लाडका । जीवमात्राला
त्यापरि हा ध्वज देशाला.
तन्नाम मात्र परिसुनी,

थरकांत भरे रिपुमनीं,
ही मशांदि जयाची भुवनीं,
घनघोर विपत्ति तरी । बघुनि ध्वजहरी । पाठिशीं परि
काळही भीत मग वीरा.
परि खड्ग सज्ज करिं ज्याचें
ध्वज रक्षणार्थ नित्याचें
तरिच तो अजिंत नभि नाचे
आपदा घोर ना तरी । तयाच्या शिरीं । किती कोसळती
बघतोच निरंतर जगतीं

## डोळे उघडाना!

स्वस्थ बैसलाना ? सारी काळजि सरली ना ? ॥
देशामध्यें कहर मातला खुशाल बघता ना ? ॥ ध्रु० ॥
धर्म भ्रष्टला ना ? तुमचा लोक बाटला ना ?
आईसारख्या गाई तुमच्या कसाब चिरिती ना ? ॥१॥
धंदा बसलाना ? तुमचा पैका लुटला ना ?
सारा भरितां गरीब कुनबी ठार बुडाला ना ? ॥२॥
गुलाम झाला ना ? आपण हमाल बनला ना ?
परवशतेचा खोडा पायीं पक्का जडला ना ? ॥३॥
शेती बसली ना ? हातीं झोळी पडली ना ? ॥
अन्नावांचुनि मरण्याची ती पाळी आली ना ? ॥४॥
शक्ति नाहीं ना ? तुह्मा मानहि नाहीं ना ?
परकयांच्या बुळग्यानीं । लाथा खुशाल खाता ना ? ॥५॥
दाणा पिकला ना ? तुमचा फन्ना झाला ना ?
घरांत अजुनी फाका करितां लज्जा नाहीं ना ? ॥६॥
झोपा मोडा ना ? जनहो ! डोळे उघडा ना ?
वेळ अजुनि ती आहे झडकरी वैभव मिळवा ना ! ॥७॥

# मानाचा तुरुंग!

हा तुरुंग हे मैदान; तुला आव्हान
ही आणिबाणीची वेळ भारता, राखी आपुला मान ॥ धृ० ॥
पदव्यांची माळ झुगारी । भारता
पद ठेवि न मुळिं दरबारीं । भारता
कां भुलुनी होशि भिकारी । भारता
चल तोड शृंखला मानभंगला सत्याग्रह तूं जाण ॥ १ ॥
व्यापार तुझा बसला रे । भारता
मग माल विदेशी कां रे । भारता
तूं घेशी भुलुनी आतां रे । भारता
जे स्वदर्थे जन्मा येती त्या तूं करिशी अन्या दान ॥ २ ॥
आपुले पण तुज नाहीं । भारता
हानि ही त्यानें होई । भारता
उघडुनि नयन आजि पाही । भारता
ही सत्याग्रह सुधा राखण्या स्वधर्म तूं करि पान ॥ ३ ॥
आली प्रभा बालसूर्याची । भारता
करि होळी आळस्याची । भारता
गर्जना राष्ट्र-मंत्राची । भारता
त्या सुरांत मिळवी सूर आपुले साधी अनुसंधान ॥ ४ ॥
हें नटवें शिक्षण सोडी । भारता
हें रडवें शिक्षण सोडी । भारता
नामर्द शिक्षण सोडी । भारता
सागरीं लोट हे हांकी । भारता
कर हिय्या या समयाला वीरा होऊं नको बेईमान ॥ ५ ॥
तूं देई धीर मनाला । भारता
आजि नेता गांधी मिळाला । भारता

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मग भीति कशाचि कोणाला । भारता
हो पुढें रणकार्याला । भारता
हे बोल आयका, नव्हा बायका, स्मरा मनीं भगवान ॥ ६ ॥

## अहा तें लोपलें सारें !

[ गझल ]

महाराष्ट्रीं स्वराज्याचे । सदा संचारले वारें ॥
फिरे कृष्णे सवें वेगें । जयाला विश्व करि मुजरे ॥ धृ० ॥
उठे गर्जुनि सह्याद्रि । क्षणीं लागून चाहूल ॥
हमाली ध्यान सानांचे । जयानें भारता भूत ॥
दऱ्या खोऱ्यांतले झाले दगड ते देव बजरंग ॥ १ ॥
अडाणी मावळे गाजी । जयाची तळपती खड्ग ॥
स्वदेशी फडकले झेंडे । महंताच्या विरागाचें ॥
समर्थांच्या सुमंत्राची । विराजे वैखरी वदनीं ॥
उठे कल्लोळ दिक्प्रांतीं । जयाच्या जादुगारीनीं ॥ २ ॥
थरारे चित्त शत्रूचें । 'हर महादेव हर' घोषें ॥
जयानें बोलतां वाचि । झटकुनी हात आवेशें ॥
स्वराज्याचे कुठें राजे । कुठें 'कल्याण-शिव' सारे ? ॥
कुठें ती धन्य शिवशाही । अहा तें लोपलें सारें ! ॥ ३

## स्वातंत्र्याचा सूर्य

तुम्हा सज्जना देश आपुला मिळवाया वाटे
तरी टाकुनी द्यावें आपुलें चरित्र उफराटे ॥ धृ ॥
देश मिळेना भजनानें या हो या म्हणुनी
देश मिळेना तीर्थाटनानें [illegible] म्हणुनी
देश मिळेना वाद घालुनी देश वैरियांशी
देश मिळावा शिकणें लोभे [illegible]

मावळे गडी मिळवुनी, योद्ध शिकवुनी, सैन्य बांधुनी
मग खेळ जीव जीवांचा
खेळावा वीर रसाचा
हा रस्ता शिवरायाचा
निकाल तेव्हां निघतील [illegible] वैऱ्यांचे [illegible] ॥
शाळा सोडा, कोर्टें [illegible], [illegible]टही फिरवा
खादी [illegible], गांधी [illegible] बाळा, बहिष्कार मिरवा,
गुप्त[illegible] [illegible] [illegible] हे सारें नीट
परी नसे हें पुरे व्हावया पुन: देशभेट
देश ही वस्तु [illegible] । [illegible] कधी । [illegible] हा बलि ।
बल मिळवा संघशक्तीनें
फल त्याविण कांहीं न व्हावे
हें काम नसे एकट्याचें
संघबल मिळवावें तेव्हां सारें कार्य घाटे ॥ २ ॥

# तलवार डोक्यावर लटकत असतांना—

अनादि मी, अमध्य मी, अनंत मी ।
अवध्य मी, अजिंक्य मी मला ।
जिंकील रिपु कवण असा जगति जन्मला ॥ ध्रु० ॥
धर्म [illegible] [illegible] ।
अट्टहास [illegible] आणि [illegible] रणी ।
न देह [illegible] आजि [illegible] न [illegible] भीतो ।
मरणाचि [illegible] [illegible] मृत्यु [illegible] [illegible] ।
तथापि [illegible] [illegible],
मुक्त हा [illegible] [illegible] निघूं पाहूं ये ॥ १ ॥
लोटि हिंस्र सिंहाच्या पिंजरी मला ।

नव शस्त्र अस्त्र यांत्रिक युद्धांगांचिया ।
कल्लोळीं ज्वाळांच्या फेंकशी जरी ।
हटुनि भवति रचिशी भींत सुरभावाले ।
आण तुझ्या तोफांना आणि सैन्य ते
मंत्र यंत्र शस्त्र आणि अस्त्र आणि तें ।
हलाहला महेश तो,
तुम्हा मी सर्वांना गिळुनि जिरवितों ॥ २ ॥

# तरुण भारतास—

* * *

निजजाति छळानें हृदय कां न तळमळते ॥
तुम्हां तरुण शिरांतुनि रक्त कां न खळखळते ॥ धृ० ॥
हे नवें रक्त तों [illegible] पेटावें
मृत्युशी तुम्ही गांठूनी वक्ष भेटावें
मग मुकुट आमुचा कोणी । फोडिला
हिंदुचा ध्वज कोणी । तोडिला
आशेचा अंकुर कोणी । मोडिला
हे चिंतुनि चिंतुनि अश्रु आसवें गळती।
दिनरात्रीं बोलवातुनि कां न रे स्फुरती ॥ १ ॥
या भारतभूस्तव समरांगणिं जे मेले
या चितेनें बहु वीर जळुनियां मेले
कुणि धीर यातनांचिया चितेवरी जळले
कुणि फांस गळ्यासि लावताहि ना ढळले
त्या त्यांच्या अपुऱ्या इच्छा । या क्षणीं
तुम्हासि मारती हाका । फोडुनि
कां पुढें येतां कोणा । यांतुनी
त्या येति तरी रे ऊठ कोण तो जो तू ॥
घे करीं शिरा जा भुज पुरवि तो हेतु ॥ २ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

# उठ दे झुगारुनि बेडी

उठ दे झुगारुनि बेडी । दास्यांत तुला जी जखडी । मर्द तू ॥ ध्रु० ॥
सोन्याची लोखंडाची । बेडी ती बेडीच साची बंधनीं ।
लखलखीत कांचनें घडली । म्हणुनि कां ढिली कधीं पडली बंधनीं ।
भीतीच्या मृदुरज्जूनीं । वा द्वेषाच्या पाशांनीं बांधिली ।
बांधितांच बंधन झालें । बंधनें कुणी कां सुटलें कधीं तरी ।
दासा जरी पदीं तुडविलें । हस्तें वा कुरवाळियलें दासची ।
चाल—मग उठ, ममानें पीट, थेटची वाट त्वरें स्विकारी, त्वरें स्विकारी,
ॐ तत्सतची ललकारी ॥ १ ॥

नारिकेळ कवचा ऐसें । हें शरीर तुज दिसलें साधनीं ।
जरी कर्म साधना झालें । परि हें ते कर्मांखालीं न गणी ।
जाईच्या फुलानें पुजिलें । लत्तेनें वा ताडिलें शरीर हें ।
नामानें हुरळुनि जाई । अवमानें क्रुद्ध न होई संयमी ।
मानापमान करणारा । तुजहुनी न भिन्न कुणी दुसरा तूंच तो ।
मग तूं कशाला करिशी । क्रोध वा कुणावरी धरिशी सांग हें ।
चाल—यापरी, विचार करीं, शांतवा धरीं, दिगंतरीं सारी, दिगंतरीं सारी,
ॐ तत्सतची ललकारी गर्जवी ॥ २ ॥

सत्याच्या दिव्य ज्ञाना । अधिकार फार थोड्यांना या जगीं ।
इतर जन हंसतील तुजला । करितील तुझ्या द्वेषाला संयमी ।
मायेच्या कृष्णावर्णीं । आवृत ही अवघी अवनी राहिली ।
निर्बंध समर्थ बनोनी उद्धरी अवघी अवनी पतितदीन ।
दुःखानें भीत न होई । अभिलाषी सुख मनीं मुळींहि ना कधीं ।
चाल—होणार, दूर हे भार, अगाध्या तार, पैलच्या तिरी पैलच्या तिरी
ॐ तत्सतची ललकारी गर्जवी ॥ ३ ॥

उठ दे झुगारुनि बेडी । दास्यांत तुला जी जखडी मर्द तू ॥ ध्रु० ॥

# पुढें या मातृभूकरितां–

सज्ज व्हा वीर हो आतां । पुढें या मातृभूकरितां ॥ ध्रु ॥
हिंदभू सर्व संपन्ना । उडवि रिपु तिचा फन्ना ।
हिरोनी मानधनमत्ता । पुढें या० ॥ १ ॥
जयाची गर्जना कानीं । ऐकुनी शत्रु भी स्वमनीं ।
सिंह तो कोकरूं बनतां । पुढें या० ॥ २ ॥
मुखींचा घास सोन्याचा । परांनीं घेतला तुमचा ।
तरी का खेद ना चिंता । पुढें या० ॥ ३ ॥
कुणीही कांहीं बोलावें । तुम्ही कां निमुट ऐकावें ।
कसे निःसत्व रे बनतां । पुढें या० ॥ ४ ॥
अरीचा एक अपशब्द । करी ज्या मानसी क्षुब्ध ।
कसे ते थंड तुम्ही बनतां । पुढें या० ॥ ५ ॥
कमविलें रक्त सांडोनी । रणीं जे वाडवडिलांनीं ।
कुठें स्वातंत्र्य तें आतां । पुढें या० ॥ ६ ॥
स्मरा या पूर्व तेजाला । स्मरा शुभ भावि कालाला ।
स्मरा श्रीभारतीमाता । मरा मग मातृभूकरितां ॥ ७ ॥

---

# राष्ट्रीय झण्डा

विजयी विश्व तिरंगा प्यारा, झंडा ऊंचा रहे हमारा
सदाशक्ति बरसानेवाला, प्रेम सुधा सरसानेवाला ॥
वीरोंको हरषानेवाला, मातृभूमिका तनमनसारा ॥ १ ॥
स्वतंत्रताके भीषण रणमें, लखकर बढे जोश क्षण क्षणमें ।
कांपे शत्रु देखकर मन में, मिट जावे भय संकट सारा ॥ २ ॥
इस झंडेके नीचे निर्भय लें स्वराज्य यह आविचल निश्चय ।

बोलो-भारतमाता की जय, स्वतंत्रता हो ध्येय हमारा ॥ ३ ॥
आओ प्यारे वीरो आओ, देश धर्म पर बलिबलि जाओ ।
एक साथ सब मिलकर गाओ, प्यारा भारत देश हमारा ॥ ४ ॥
इसकी शान न जाने पाये, चाहे जान भलेही जाये ।
विश्वविजय करके दिखलायें, तब होवे प्रण पूर्ण हमारा ॥ ५ ॥

---

# पोलीसदादा !

पोटासाठीं मक्कम लाठी घेऊनि स्कंधावरी ।
करितसां नीचांची चाकरी ॥ ध्रु० ॥
मातापितरांस वा गुरुजनां प्रभुला नच वंदिलें ।
वरिष्ठा परि तनमन अर्पिलें ॥
हें काय पहातां उठा लाठी चालवा ।
हा हुकुम होतसे सायबांचा जेधवा ।
हूं म्हणतां तुमची लुडबूड किती पाहवा ।
चालवितां ती खुशाल लाठी स्वबांधवांच्या शिरीं ॥
अशि ही गुलामवृत्ति का धरी ॥ १ ॥
तुरुंग्या सडवितां पडतां नरकीं मनुजपणा विसरुनि ।
कळेना कोण जगाचा धनी ॥
फुकट खाया खुशाल खाता । आज तिळही नच मनीं
कोण मी करी न चिंतन कुणी ॥
हा शिपाई बाणा कोणापुढें मिरवितां ।
ती कठोर लाठी कुणावरी फिरवितां
कां बंधुभगिनींचें वृथा रक्त सांडितां
'गर्जा हाय हाय' अशी वानर सेना करी ।
गर्जना थूः तुमची चाकरी ॥ २ ॥

समाप्त.